हिन्दुस्तान फीड्स



## 'नीलम' पशुखाद्याचा वापर करण्यासाठी दैनिक मात्राची शिफारस (ग्रॅम मध्ये)

**५०० ग्रॅम प्रती लिटर**

**म्हैशीची ठेवण व शरीर पोषणासाठी १.५ किलो नीलम खाद्य अतिरिक्त द्यावे.**

### महत्वाची सुचना

वेगवेगळ्या विभागातील क्षेत्रीय चाऱ्याच्या गुणवत्तेनूसार वरील मात्रेत बदल होऊ शकतो.

### 'नीलम' खाद्य वापरण्याची पध्दत

नवीन खाद्य द्यावयास सुरु करताना प्रथम काही दिवस कमी प्रमाणात खाद्य देऊन हळुहळू सवय लागेल तसे खाद्याचे प्रमाण वाढवित जावे.

### पुरवठा पॅकिंग व उपलब्धी संबंधी सुचना

'नीलम' हे पशुखाद्य गोळीच्या स्वरुपात उपलब्ध आहे. हे खाद्य ५० कि. ग्रॅ. च्या आकर्षक लॅमिनेटेड प्लॅस्टिक बॅगमध्ये उपलब्ध आहे. नीलम हे खाद्य आपल्या नजीकच्या 'हिन्दुस्तान फिड्स' पशुखाद्य विक्रेत्याकडे मागणी केल्यास उपलब्ध होईल.

अधिक माहितीसाठी सोबत दिलेल्या ग्राहक सेवा क्रमांकावर संपर्क साधावा.

### साठवणूक

- 'नीलम' पशुखाद्याची साठवणूक ही थेट सुर्य प्रकाशापासून दूर,थंड, बंद व कोरड्या जागेत करावी जेणेकरुन साठवलेल्या ठिकाणी आद्रता व तापमान कमीत कमी राहून पशुखाद्याची साठवणूक चांगली होईल.
- पशुखाद्यास कोणत्याही प्रकारे ओलावा लागणार नाही याची खात्री करणे आवश्यक आहे, यामुळे पशुखाद्याचे बुरशीपासुन संरक्षण होते.
- 'नीलम' हे पशुखाद्य वेळोवेळी आवश्यक त्या प्रमाणात खरेदी करावे. त्यामुळे त्यामधील पोषणमुल्यांचा ह्रास होत नाही.
- **सदरचे खाद्य हे फक्त दुधाळ म्हैशींना द्यावे.**

### 'हिन्दुस्तान फीड्स' च्या पशुखाद्याचा दर्जा

पशुखाद्य निर्मितीसाठी वापरण्यात येणारे विविध प्रकारचे अन्नघटक खरेदी करुन स्विकारताना विविध चाचण्या घेऊन त्यांच्या दर्जा बाबत खात्री केली जाते. अशा प्रकारचे दर्जेदार घटक पशुखाद्य निर्मितीसाठी वापरल्याने तयार होणारी पशुखाद्ये देखील तेवढीच दर्जेदार असतात. त्याचबरोबर कंपनीच्या अत्याधुनिक वैशिष्टपूर्ण यंत्रसामग्रीमुळे पशुखाद्य पोहचणेपूर्वीच खराब माल पुर्णतः वेगळा काढला जातो. कंपनीच्या स्वतःच्या अत्याधुनिक व सुसज्ज प्रयोगशाळांमध्ये त्यामधील विविध पौष्टक घटकांची तपासणी केली जाते. या सर्व बाबींमुळे ग्राहकाला मिळणारी पशुखाद्ये ही नेहमीच हमखास दर्जेदार असतात.

### 'हिन्दुस्तान फीड्स' ची विक्रीपश्चात सेवा

'हिन्दुस्तान फिड्स' चे शास्त्रोक्त प्रशिक्षण घेतलेले प्रतिनिधी ग्राहकांना वेळोवेळी भेट देऊन योग्य मार्गदर्शन आणि तक्रार निवारण करीत असतात. दूग्धव्यवसायातील वाढती स्पर्धा व आव्हाने यांना तोंड देण्यासाठी कंपनीतर्फे पशुपालकांसाठी विस्तार व प्रशिक्षण शिबीर राबविले जाते. यामध्ये या क्षेत्रात तज्ञांकडून त्यांना पशुसंगोपन व दुग्धव्यवसायातील आधुनिक तंत्रज्ञान, सर्वोत्कृष्ट पशुपोषण, आहार व्यवस्थापन व प्राप्त परिस्थितीमध्ये दुग्धव्यवसाय किफायतशीर कसा करावा यासंबंधी मार्गदर्शन केले जाते.

**गोवत्स स्टार्टर**
मातेच्या दूधासारखे पौष्टीक
खास वासरांसाठी बनवलेले पशुखाद्य
■ ५० कि. प्लॅस्टिक पॅकिंगमध्ये उपलब्ध

**हिरा**
दुधाळ गायी-म्हैशींसाठी कमी मात्रेत अधिक दूध उत्पादन
■ ५० कि. प्लॅस्टिक पॅकिंगमध्ये उपलब्ध

**कनक ज्युनिअर**
करडांची जोमाने सुदृढ शरीर वाढ होण्यासाठी सकस व संतुलित आहार
■ २५ कि. प्लॅस्टिक पॅकिंगमध्ये उपलब्ध

**गोवत्स ग्रोवर**
वासरांच्या जलद व सुदृढ वाढीसाठीचा सर्वोत्कृष्ट पशुआहार
■ ५० कि. प्लॅस्टिक पॅकिंगमध्ये उपलब्ध

**कोहिनूर**
दुधाची लाट कोहिनूरची साथ
■ ५० व ५९ कि. प्लॅस्टिक पॅकिंगमध्ये उपलब्ध

**कनक सिनियर**
शेळ्या मेंढ्या व बोकडांसाठी सर्वोत्कृष्ट आहार
■ २५ कि. प्लॅस्टिक पॅकिंगमध्ये उपलब्ध

**गोवत्स हीफर**
प्रजनन चक्र, शरीर संगोपन व भरपुर दुग्धोत्पादनाच्या तयारीसाठीचा समतोल पशुआहार
■ ५० कि. प्लॅस्टिक पॅकिंगमध्ये उपलब्ध

**गोल्डकॉर्न**
अधिक उर्जायुक्त पशुआहार
■ ५० कि. प्लॅस्टिक पॅकिंगमध्ये उपलब्ध

**बलराम**
बैलांना ताकदवान बनविणारा खुराक
■ २५ कि. प्लॅस्टिक पॅकिंगमध्ये उपलब्ध

**वात्सल्य**
(Transition feed)
गायी-म्हैशीच्या प्रसुतीच्या अतिसंवेदनक्षम काळातील पोषणासाठी सर्वोत्कृष्ट किफायतशीर पशुआहार
■ ५० कि. प्लॅस्टिक पॅकिंगमध्ये उपलब्ध

**हिन्दुस्तान चिलेटेड फीड सप्लिमेंट**
उच्च दर्जाची अत्यावश्यक खनिजे व पोषणतत्वांचा पूरक आहार
■ १ कि. प्लॅस्टिक पॅकिंगमध्ये उपलब्ध

**अश्वशक्ती**
घोड्यांसाठी पौष्टिक आहार, आरोग्य, उर्जा आणि शक्ती यांचा त्रिवेणी संगम
■ ५० कि. प्लॅस्टिक पॅकिंगमध्ये उपलब्ध

हिन्दुस्तान फीड्स

"बांधिलकी गुणवत्तेशी"


**सातारा युनिट**
एल-४, ॲडिशनल एम. आय. डी. सी.,
सातारा - ४१५ ००४
फोन : ०२१६२ - २४०४७१ / २ / ५ मोबा : ९०११०१२७६२
ईमेल : marketing.str@hindustanfeeds.com

**बारामती युनिट**
इ-२४८, एम.आय.डी.सी., बारामती,
जि. पुणे - ४१३ १३३
फोन : ०२११२ - २४३८३४, २४३६३४, २४३६८२
ईमेल : marketing.bmt@hindustanfeeds.com

**श्रीरामपूर युनिट**
इ-५, एम. आय.डी.सी., श्रीरामपूर,
जि. अमहदनगर - ४१३ ७०९
मोबा : ९८२२५३३३५७ । ७४४७७९५७४७
ईमेल : marketing.srm@hindustanfeeds.com


पशुखाद्य निर्मितीमध्ये नं. 1



हिन्दुस्तान फीड्स

# नीलम

## खास म्हैशींसाठी बनविलेला पशुआहार

## दर्जेदार व भरपूर फॅटयुक्त दुग्धोत्पादनासाठीचा सकस पशुआहार





'**हिन्दुस्तान फिड्स**' ही कंपनी ३० वर्षांहून अधिक काळ पशुखाद्य क्षेत्रात कार्यरत असून सर्व शेतकऱ्यांना सुपरिचित आहे. कंपनीचे सातारा, बारामती व श्रीरामपूर येथे अत्याधुनिक कारखाने असून वेगवेगळ्या प्रकारच्या पशुखाद्याचा १५०० मेट्रिक टन प्रतिदिन इतका पुरवठा महाराष्ट्रात नियमितपणे केला जातो. वेगवेगळ्या जनावरासाठी पौष्टीक अन्नघटकांची गरज ही पुर्णतः वेगळी असते. जनावराची जात, उपलब्ध चारा, दूध देण्याची क्षमता, दूधातील फॅटचे प्रमाण, गाभणकाळ, वेतातील कालावधी इत्यादी बाबींवर या गरजा अवलंबून असतात. त्यानुसार वेगवेगळ्या प्रतीच्या जनावरासाठी '**हिन्दुस्तान फिड्स**' ने वेळोवेळी पशुखाद्याची मालिकाच निर्माण करीत आहे. नीलम नावाने ओळखली जाणारी खास म्हैशींसाठीची पशुखाद्य निर्मीती ही अलीकडील अशीच एक नाममुद्रा.

## थोडे म्हैस वंशावळीबाबत नवीन विचार

जगातील मुऱ्हा, जाफराबादी, म्हैसाणा, सुरती, पंढरपुरी यासारख्या दर्जेदार म्हैशी आपल्या देशात असून एकुण दुभत्या जनावरात त्यांचा ५३% हिस्सा आहे. म्हैशीचे मूळ भारतात असल्याने त्या येथील वातावरणाशी समरस झालेल्या आहेत. तुलनात्मकदृष्ट्या थंड प्रदेशातील होलस्टिन, जर्शीसारख्या गायीचे वाण व त्यापासून आपल्या देशात निर्माण होणारी संकर पैदास यांच्या दुध उत्पादन व प्रजनन कार्यात आपल्याकडील वातावरणातील उष्णतेच्या चढउताराचा विपरीत परिणाम होतो तसा म्हैशींच्या बाबतीत कमी होतो.

## वंशावळीनूसार म्हैशींची वैशिष्ठ्ये

- गायीपेक्षा केसाळ व कातडीखाली कमी घर्म ग्रंथी.
- पायाचे खुर मजबूत असल्याने लंगडण्याचे प्रमाण कमी.
- कासेचे सड मजबूत असल्याने दोहन निर्दोष पद्धतीने केल्यास सडाचे विकार कमी.
- दुधातील स्निग्ध व इतर घन पदार्थाच्या प्रमाणाचे गायीच्या मानाने दुभत्यात होणारे कमी चढउतार (Less Fluctuation)


## संकरीत गायींच्या दुधाच्या तुलनेत म्हैशीच्या दुधाची वैशिष्ठ्ये

- मानवाच्या आयुष्यातील सर्व अवस्थांमधील पोषणास उपयुक्त ठरणाऱ्या कॅल्शियमसारख्या खनिजांचे गायीच्या दुधातील प्रमाणापेक्षा जास्त प्रमाण.
- संकरीत किंवा परदेशी गायीच्या तुलनेत म्हैशीचे दुध घट्ट असल्याने भारतीयांची चव तृप्त होते.
- चहा, कॉफी, दही, लस्सी, तूप, ताक, लोणी इत्यादी प्रकारच्या तयार केलेल्या दुग्धाजन्य पदार्थाच्या दर्जेदार उत्पादनासाठी गायीपेक्षा म्हैशीच्या दुधाला पसंती.
- दुधातील पेरॉक्सिडेस (Peroxides) सारख्या विकरांच्या (Enzyme) वाढत्या मात्रेमुळे दुधास निर्माण झालेली गायीच्या दुधापेक्षा अधिक टिकाऊ क्षमता.
- दुध उकळण्याच्या तापमानास दुधातील प्रथिनांची तग धरण्याची क्षमता गायीच्या दुधापेक्षा अधिक त्यामुळे उकळल्यानंतरही त्यातील प्रथिनांचे पोषणमुल्य टिकून राहते.
- गाय व म्हैस यांच्या दुध, पचन संस्था, आहार दैनंदिन सवयी, आरोग्य यामध्ये फरक असतो.

वरील नमुद कारणांमुळे संकरित गायीच्या दुधापेक्षा म्हैशीचे दुध श्रेष्ठ ठरल्याने म्हैस पालकास दुध विक्रीसाठी विशेष प्रयत्न करावे लागत नाहीत.

## गायी-म्हैशींच्या चारा व अन्न पचन संस्थेतील फरक

- आहारातील चाऱ्यातील तंतुमय पदार्थाच्या पचनासाठी आवश्यक असणारे व म्हैशींच्या कोटीपोटात जोपासलेले सुक्ष्म जिवाणू हे गायीच्या कोटीपोटातील सुक्ष्म जिवाणूपेक्षा वेगळ्या प्रकारचे व जास्त संख्येने असतात. असे जिवाणू तंतूमय पदार्थाचे सुध्दा पचन करतात.
- म्हैशींच्या कोटीपोटीची क्षमता गायीपेक्षा अधिक असते.
- गायीपेक्षा २९ ते ४०% इतकी जास्त रवंथ करण्याची म्हैशींमध्ये क्षमता व त्यामुळे रवंथ प्रक्रियेत त्यांनी खाल्लेल्या चाऱ्याचे होणारे चर्वण व पचन उत्तम होते.



- अधिक रवंथ झाल्यामुळे खाल्लेल्या चाऱ्यातील कणांचे आकारमान कमी होऊन त्यावर कोटीपोटातील जिवाणूंची प्रक्रिया परिणामकारक होऊन चाऱ्याचा कोटीपोटातील धारण कालावधी गायीपेक्षा कमी राहतो त्यामुळे आहारातील चारा कमी प्रतीचा असला तरी सेवन व पचन चांगले होते.
- अधिक रवंथ झाल्यामुळे चारा व आंबवनातून दिले जाणारे मौल्यवान घटक व पोषणसत्वांच्या कणांचे आकारमान कमी होऊन चांगले पचन होते. त्यामुळे ते घटक शेणातून बाहेर पडण्याची शक्यता कमी असल्याने आहारातून दिलेल्या पोषणमुल्यांचा शेणावाटे ऱ्हास होत नाही, त्यामुळे होणारे नुकसान टळते.
- पचनासाठी आवश्यक कोटीपोटाची आकुंचन व प्रसरण प्रक्रिया ही गायीच्या कोटीपोटापेक्षा प्रभावी असते त्यामुळे म्हैशीच्या कोटीपोटाच्या पचनासंबंधीचे विकार बेताचे असतात. त्यामुळे तुलनात्मकदृष्ट्या औषधोपचार खर्च कमी असतो.
- म्हैशीच्या कोटीपोटातील आंबवन व चारा पचनातून निर्माण होणाऱ्या स्निग्ध उर्ध्वाम्लाचे (Volatile Fatty Acid) प्रमाण गायीच्या कोटीपोटातील प्रमाणापेक्षा जास्त असते. या सर्वाचा परिणाम म्हणजे चारा व आंबवणाचा उपयोग गायीपेक्षा म्हैशींमध्ये चांगला होतो.

अनादीकाळापासून म्हैशीच्या पांढऱ्या शुभ्र दुधास भारतीय ग्राहकाची पसंती असते. ग्राहकाची आर्थिक स्थिती सुधारल्याने ग्राहकाच्या राहणीमानात व आहारात सकारात्मक बदल झाला आहे. त्यामुळे ग्राहक म्हैशीच्या दर्जेदार दुधास चांगला दर देण्यास नेहमी तयार असतो.

## पारंपारिक खाद्याविषयी

बहूतांश म्हैसपालक म्हैशीच्या आहारात पारंपारिक खाद्याचा वापर करतात. उदा. सरकी पेंड, वेगवेगळ्या प्रकारच्या चुनी, खाद्यतेले, भुस्सा इत्यादी अशा प्रकारच्या पारंपारिक खाद्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारची भेसळ केलेली असते. अशी भेसळ सहजासहजी ओळखू येत नाही. परंतु अशा खाद्याच्या वापराने जनावरांच्या आरोग्यावर व दुध उत्पादनावर विपरित परिणाम होतो. त्यामुळे म्हैसपालकाचे आर्थिक नुकसान होते.

सामान्यतः वरील खाद्यामध्ये खालील प्रकारे भेसळ आढळून येते. सरकीमध्ये सरकी बी वरील आवरण, भुस्सा, कोंडा, स्वस्त प्रकारची मका चुनी, कृत्रीम रंग, अखाद्य वस्तू (लोखंड, प्लास्टीक), जास्त वापरत नसलेले खाद्य अथवा टाकाऊ पदार्थ इत्यादी प्रकारची भेसळ आढळून येते. चुनीमध्ये वजन वाढवण्यासाठी दगडी पावडर, मीठ, कमी दर्जाचे इतर धान्याचे पीठ, इतर धान्याचे बारीक केलेले फोल यांची भेसळ दिसून येते. भुश्यामध्ये दमटपणा जास्त असतो त्यामुळे तो लवकर खराब होतो व दमटपणामुळे वजन जास्त असते. शिवाय त्यामध्ये मातीचे प्रमाण सुध्दा आढळते. खाद्यतेल थेट जनावरांना दिल्यामुळे जनावरांना फायदा होण्याऐवजी त्यांच्या पचनसंस्थेवर विपरित परिणाम होतो. या शिवाय अशा पारंपारिक खाद्याचे वजन हे प्रमाणित नसल्याची शक्यता जास्त असते. सरकी पेंडीमध्ये ग्लॉसिफॉल हा विषारी घटक असतो. सरकी पेंडीच्या सतत वापराने हा घटक शरीरात साठला जातो. व त्यामुळे प्रजनन संस्थेचे विकार निर्माण होऊन म्हैशी लवकर गाभण रहात नाहीत. त्याचा भाकडकाळ वाढतो व परिणामी आर्थिक नुकसान होते.

वरील सर्व पारंपारिक खाद्यामध्ये आहाराचा समतोल साधलेला नसतो. म्हैशींना आहारातील एखादा घटक मोठ्या प्रमाणात दिला जातो. त्यामुळे आहाराचे संतुलन बिघडून दुध उत्पादनात घट होऊन आरोग्यावर विपरित परिणाम होतो. या पारंपारिक खाद्याच्या घटकांमध्ये सातत्य नसल्याने दुध उत्पादनामध्येही सातत्य रहात नाही. आहारामध्ये सातत्य असणे हे जनावरांच्या दृष्टीने फायदेशीर आहे हे दुध उत्पादकांनी नेहमी लक्षात ठेवावे. अशा प्रकारच्या पारंपारिक खाद्य उत्पादकाकडून ग्राहकांना कोणतीही विक्रिपश्चात सेवा पुरविली जात नाही.

पारंपारिक पशुआहार वापराच्या वरील त्रुटी लक्षात घेऊन म्हैशीच्या पचनसंस्थेचा व दुधामधील घटकांचा अभ्यास करुन '**हिन्दुस्तान फिड्स**' ने खास म्हैशींसाठी स्वतंत्र पशुआहार बनवला आहे. या आहारामध्ये म्हैशींसाठी उपयुक्त असणाऱ्या वेगवेगळ्या पौष्टीक अन्नघटकांचा पशुआहार तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली वापर करुन खास म्हैशीच्या दर्जेदार व भरपूर फॅटयुक्त दुग्धोत्पादनासाठी '**नीलम**' या नावाने सकस पशुआहार बाजारात उपलब्ध केलेला आहे.



# 'नीलम' पशुखाद्यच का वापरावे ?

| खाद्यातील घटक | पारंपारिक खाद्य (शेंगदाणा/सरकी पेंड, गहूभुसा, चुनी इ.) | 'नीलम' |
|---|---|---|
| योग्य प्रमाणात प्रथिनांचा (प्रोटिन्स) पुरवठा | नसतो | असतो |
| अमिनो ॲसिड मधील विविधता | नसते | असते |
| स्निग्ध पदार्थ (फॅट्स) चा प्रमाणबध्द पुरवठा | नसतो | असतो |
| शरीराच्या आवश्यकतेनुसार जीवनसत्वे, मिनरल्स व क्षार यांचे मिश्रण | अनिश्चित व वर खाली होणारे | निश्चित खात्री असणारे |
| सर्व पौष्टिक घटकांचे सुयोग्य संतुलन | नसते | असते |
| दर्जाची हमी व दर्जातील सातत्य | नसते | असते |
| पचनीयता | वर खाली होणारी | वाढीव |
| अन्न घटकांचे दुधात रुपांतर | सामान्य | किफायतशीर |
| नमुद केलेल्या वजनाची खात्री आणि सातत्य | नसते | असते |
| खाद्याच्या दर्जेदार पॅकिंग आवरणाचा पुरेपुर वापर | नसते | असते |
| खाद्याचा पशुपालकास नियमित पुरवठा/उपलब्धतेची हमी | नसते | असते |
| किंमतीतील सातत्य | नसते | असते |
| दुध उत्पादनातील सातत्यावर सकारात्मक परिणाम | नसते | असते |
| जनावरास हानीकारक पशुखाद्यातून जाणाऱ्या अखाद्य वस्तुंपासून (लोखंड, प्लॅस्टिक इ.)संरक्षण | नसते | असते |
| प्रजनन संस्थेचे आरोग्य | बिघडते | सुधारते |
| प्रजनन चक्रातील सातत्य | नसते | असते |
| विक्रिपश्चात सेवा | नसते | असते |
| पशुखाद्याकरीता मोजलेल्या पै-पै चा मोबदला | नाही | मिळतो |